प्रकरण ६ वे

# उपसंहार

## प्रकरण ६ वे
# उपसंहार

लोकशाही शासनव्यवस्थेत लोकांचे सहभागित्व जास्तीत जास्त असण्यावर या व्यवस्थेचे यश अवलंबून असते. लोकांच्या सहभाशिवाय लोकशाहीला अर्थ उरत नाही. किंबहुना लोकांच्या सहभागाशिवाय लोकशाही ही आत्मा हरवलेल्या शरीरासारखी असते. यासाठी लोकांचा जास्तीत जास्त सहभाग कसा वाढेल याकडे लक्ष देण्याची व त्यादृष्टीने उपाययोजना करण्याची आवश्यकता असते. लोकांचा सहभाग वाढविण्यासाठी सत्ता लोकांपर्यंत पोहोचली पाहिजे, विकासाच्या नियोजन प्रक्रियेत ते सामील झाले पाहिजेत, विकास कामांच्या अंमलबजावणीची जबाबदारी त्यांनी स्वीकारली पाहिजे. याचाच मार्ग म्हणून सत्तेच्या विकेंद्रीकरणास लोकशाहीत महत्वाचे स्थान दिले जाते.

भारतात पंचायतीराज्य व्यवस्था अस्तित्वात आली आहे. ती मुळात सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या तत्त्वामधून केंद्र आणि राज्य शासन यांच्याबरोबर शासन व्यवस्थेतील तिसरा महत्वाचा घटक म्हणून जिल्हा मान्य करण्यात आला आहे. पंचायतीराज्य व्यवस्था लोकशाही प्रशिक्षणाच्या शाळा ठराव्यात अशी अपेक्षा आहे. बवलंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सादर केलेल्या अहवालानंतर पंचायतीराज्य व्यवस्थेला गती मिळाली भारतातील वेगवेगळ्या राज्यात पंचायती राज्यसंस्था अस्तित्वात आल्या. लोकांच्या हाती सत्ता देण्याचा प्रयोग सुरू झाला. तथापि, त्यास अपेक्षित यश मिळाले नाही. सत्तेच्या विकें द्रीकरणाची संकल्पना चांगली असली तरी खऱ्या अर्थाने सत्तेचे विकेंद्रीकरण झाले असे म्हणता येत नाही. ग्रामीण समाजाला निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेणे आवश्यक होते. याबाबीचे महत्व लक्षात घेता अशोक मेहता समितीने आवश्यकता असेल तर भारताच्या राज्यघटनेत दुरूस्ती करून पंचायतीराज्य संस्थांना भारतीय लोकशाहीत योग्य

ते स्थान देण्याची शिफारस केली होती. भारतीय राज्यघटनेत पंचायतीराज्य व्यवस्थेत स्थान देण्याची प्रक्रिया स्व. राजीव गांधी पंतप्रधान असताना सुरू झाली आणि कालांतराने श्री.पी.व्ही. नरसिंहराव पंतप्रधान असताना १९९२ साली भारतीय राज्यघटनेत ७३ ची दुरूस्ती करून पंचायतीराज्य व्यवस्थेस संविधानिक दर्जा देण्यात आला. यामुळे सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या नव्या पर्वास सुरूवात झाली.

१९९२ पूर्वी भारतात काही राज्यात त्रिस्तरीय तर काही राज्यांत द्विस्तरीय आणि गोवा व त्रिपुरासारख्या राज्यात एकस्तरीय पंचायतीराज्य व्यवस्था अस्तित्वात होती. १९९२ च्या भारतीय राज्यघटनेतील ७३ व्या घटनादुरूस्तीने या व्यवस्थेत एकसूत्रीपणा आणला आहे. पंचायतीराज्य संस्थांची संरचना जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत अशी त्रिस्तरीय करण्यात आली आहे. मात्र ज्या राज्याची लोकसंख्या २० लाखांपेक्षा कमी आहे. अशा राज्यांत मात्र द्विस्तरीय म्हणजेच जिल्हा पातळी आणि गाव पातळीवर अशा संस्था स्थापन करण्यास मान्यता दिली आहे.

महाराष्ट्र राज्यात १९६१ पासूनच त्रिस्तरीय पंचायतीराज्य व्यवस्था अस्तित्वात असून त्यामध्ये जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत यांचा समावेश आहे आणि ७३ व्या घटनादुरूस्तीनंतरही ती व्यवस्था कायम आहे. यापैकी जिल्हा परिषद व पंचायत समिती यांचा कारभार महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अन्वये तर ग्रामपंचायतींचा कारभार मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ अन्वये सुरू आहे. १९५८ च्या अधिनियमात वेळोवेळी महाराष्ट्र सरकारने दुरूस्त्या केल्या असून बदलत्या काळानुसार हा अधिनियम अद्ययावत करण्यात आला आहे.

**समारोप :**

भारतीय लोकशाहीची ग्रामपंचायत ही प्रयोग शाळा असल्यामुळे येथील लोकशाही व्यवस्था मजबूत करण्यासाठी ग्रामपंचायत आवश्यक असल्यामुळे प्रस्तुत शोध प्रबंधासाठी ''पंचायती राज व्यवस्थे अंतर्गत ग्रामपंचायत कुंभारी, ता.द.सोलापूर, एक अभ्यास'' (१० वी पंचवार्षिक योजना) हा विषय निवडला आहे. प्रस्तुत शोधप्रबंध एकूण ६ प्रकरणामध्ये विभागला आहे. त्याचे थोडक्यात विश्लेषण पुढीलप्रमाणे करता येईल.

**प्रकरण १ ले भारतीय लोकशाही :**

या पहिल्या प्रकरणामध्ये जगातील लोकशाही राज्याचा उदय, प्राचीन काळातील लोकशाही व्यवस्था तसेच ग्रीसमधील लोकशाहीची संकल्पना यांचा थोडक्यात आढावा घेऊन, इंग्लंडमधील रक्तविहीन क्रांती (१६८८), अमेरिकन राज्यक्रांती (१७७६) आणि नंतर फ्रान्सची राज्यक्रांती (१७८९) यांनी लोकशाही विचाराला कशी चालना दिली याचे वर्णन केले आहे. याबरोबच लोकशाही संकल्पनेचा कसा विकास झाला, तिचे पुरस्कर्ते आणि लोकशाहीची व्याख्या याचा अभ्यास केला आहे. त्यासोबतच भारतीय लोकशाही पद्धती, तिची अंमलबजावणी आणि तिच्या वेगवेगळया वैशिष्ट्यांची चर्चा या प्रकरणात सविस्तरपणे केलेली आहे.

**प्रकरण २ रे विकेंद्रीत लोकशाहीचा विकास :**

या प्रकरणात भारतात विकेंद्रीत लोकशाहीचा विकास कशा पद्धतीने होत गेला याची चर्चा करण्यात आली आहे. यात विशेषत: सत्ता विभाजनाचा सिद्धांत म्हणजे काय?

विकेंद्रीत लोकशाही म्हणजे काय? या विकेंद्रीत लोकशाहीचा विकास कोणकोणत्या पद्धतीने झाला आणि तिची सद्य:स्थिती काय आहे. याची खोलवर चर्चा केली आहे. याबरोबरच भारतीय लोकशाही व्यवस्था मजबूत करण्याऱ्या ७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरूस्त्या आणि त्यांची वैशिष्ट्ये यांचा तपशीलवार अभ्यास करण्यात आला आहे. तसेच पंचायतीराज्य व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्याठी केंद्र व राज्य सरकारांनी वेळोवेळी नेमलेल्या विविध समित्यांच्या शिफारशींचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे.

**प्रकरण ३ रे संशोधन पद्धती :**

प्रस्तुत प्रकरणामध्ये पंचायतीराज व्यवस्थेअंतर्गत ग्रामपंचायतीसाठी, ता.द.सोलापूर एक अभ्यास (१० वी पंचवार्षिक योजना) विषय शोधसाठी का निवडला? विषय निवडीचा उद्देश, गृहितके तसेच संशोधनाची वेगवेगळी उद्दिष्ट्ये व संशोधन पद्धती या गोष्टींचा ऊहापोह केला आहे.

**प्रकरण ४ थे कुंभारी गावाची माहिती :**

या प्रकरणात सुरूवातीला सोलापूर जिल्हयाची व दक्षिण सोलापूर तालुक्याची संक्षिप्त माहिती देण्यात आली आहे. त्यानंतर कुंभारी गावाची माहिती देण्यात आली आहे. कुंभारी गावाची माहिती अनेक मुद्यांच्या आधारे देण्यात आलेली आहे. त्यात प्रामुख्याने भौगोलिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक, सांस्कृतिक आणि औद्योगिक व रोजगारविषयक इ. बाबींचा समावेश आहे.

**प्रकरण ५ वे कुंभारी ग्रामपंचायत विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी २००२-२००७ :**

या प्रकरणामध्ये सर्वसाधारणपणे ग्रामंपचायतीचा कारभार कसा चालतो. ग्रामपंचातीच्या उत्पन्नाची साधने कोणती? सन २००२-२००७ या १० व्या पंचवार्षिक योजनेत कुंभारी गावामध्ये कोणकोणती विकास योजना ग्रामपंचायतीने राबवल्या त्याचा आकडेवारीनुसार तपशील देण्यात आलेला आहे.

**प्रकरण ६ वे उपसंहार :**

या प्रकरणामध्ये पंचायती राज्य व्यवस्थेचा सुरूवातीपासूनचा आतापर्यंत सर्वसाधारण आढावा घेण्यात आला आहे. तसेच अनेक वेगवेगळ्या संकल्पनांची संक्षिप्त चर्चा करण्यात आली आहे. त्यात प्रामुख्याने उल्लेख करायचा म्हणजे लोकशाही सहभाग, सत्तेचे विकेंद्रीकरण, ७३ वी घटनादुरूस्ती इ. चा समावेश आहे. त्याबरोबरच स्थानिक स्वराज्य संस्थांचा वेगवेगळ्या समस्या / दोष याची थोडक्यात माहिती देण्यात आली आहे. त्याबरोबरच या समस्या / दोष दूर करण्यासाठी किंबहुना त्याची सोडवणूक कशाप्रकारे करता येईल त्यासंबंधी उपाय सुचविले आहेत.

**मूल्यमापन :**

प्रस्तुत शोधप्रबंधासाठी कुंभारी ग्रामपंचायतीच्या विषयाअंतर्गत १० व्या पंचवार्षिक योजनेचा अभ्यास केल्यानंतर काही मूलभूत निष्कर्ष आपणास पुढीलप्रमाणे मांडता येतील.

कुंभारी ग्रामपंचायतीने १० व्या पंचवार्षिक योजनेत अनेक महत्वपूर्ण विकास कामे केलेली आहेत. ज्यात विशेष करून आरोग्य, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था, यासारख्या पायाभूत सुविधांवर विशेष लक्ष दिले आहे.

तसेच इंदिरा आवास योजने अंतर्गत सर्वसामान्य गोरगरिब नागरिकांना लाभ मिळवून देण्यात ग्रामपंचायतीने सिंहाचा वाटा उचलला आहे. त्यामुळे त्यांना निवारा उपलब्ध झाला आहे.

ग्रामसभेच्या माध्यमातून जे लोकोपयोगी ठराव झाले त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांचा राजकीय सहभाग वाढला की ज्याचा फायदा लोकांना आपल्या विकासासाठी प्रत्यक्ष लोकशाही कारभारात सहभागी होता आले व घटनात्मक ग्रामसभेचे लोकराज्यात रूपांतर होण्यास मदत झाली.

तरीसुद्धा पंचायतीराज्य व्यवस्थेतील काही दोषाकडे दुर्लक्ष करून लोकशाही बळकट होणार नाही. त्यामुळे पंचायती राज्य व्यवस्थेतील निरनिराळे दोष आणि त्यावरील सर्वसामान्य उपाययोजना पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या समस्या :**

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनेक दोष निर्माण झाले आहेत. त्याचे थोडक्यात वर्णन पुढीलप्रमाणे करता येईल.

१) पंचायतीराज्य व्यवस्थेला आजसुद्धा एक स्वतंत्र घटक म्हणून काम करता येत नाही, कारण वाढत्या राजकीय हस्तक्षेपामुळे ते अवघड आहे.

२) ग्रामीण प्रशासनाला सर्वांगिण विकास कार्यक्रमांची जबाबदारी पार पाडणे खूप कठिण आहे, कारण त्यांच्याजवळ पुरेशा प्रमाणात साधनसामग्री उपलब्ध नाही.

३) अधिकारी वर्गात एकवाक्यता नसल्यामुळे विकास कामात अडथळा येतो.

४) पक्षीय हस्तक्षेप व राजकीय पक्षांची स्पर्धा वाढल्यामुळे ग्रामीण पातळीवरील सामाजिक व राजकीय वातावरण गढूळ झाले आहे.

५) पंचायती राज्य व्यवस्थेत विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीपेक्षा राजकारण जास्त आढळते. त्यामुळे लोकांत असंतोष आहे.

६) पंचायतीराज्य व्यवस्थेचा संबंधित कार्यक्षेत्रातील खासदार, आमदार, स्वत:चा स्वार्थ साधण्यासाठी या व्यवस्थेचा एक साधन म्हणून वापर करतात.

७) पंचायतीराज्य व्यवस्थेतील पदाधिकारी व सदस्यांना कायदा व प्रशासनाबद्दल फारशी माहिती नसल्यामुळे प्रशासनात गोंधळ निर्माण होतो.

अशारितीने पंचायती राज्य व्यवस्थेत अनेक दोष निर्माण झालेले आहेत. हे दोष दूर करण्यासाठी आपणास पुढीलपम्राणे उपाय सुचविता येतील.

**उपाय योजना :**

१) पंचायतीराज्य व्यवस्थेत राजकीय विकेंद्रीकरणाबरोबरच प्रशासकीय विकेंद्रीकरण घडवून आणून लोकसहभाग वाढविण्यासाठी लोकांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

२) नियोजन प्रक्रियेची संकल्पना सबळ व्हायला हवी की, ज्यामुळे ग्रामीण भागाचा सर्वांगिण विकास होण्यास हातभार लागेल.

३) पंचायतीराज्य व्यवस्थेतील नियोजन व प्रशासन या दोन विभागात सुसंवाद निर्माण होणे गरजेचे आहे.

४) पंचायती राज्य व्यवस्थेच्या माध्यमातून स्थानिक पातळीवरील लोकांना वेगवेगळ्या गोष्टींचे शिक्षण / प्रशिक्षण देऊन त्यांना संघटित होण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे.

५) पंचायती राज्य व्यवस्था बळकट करण्यासाठी स्थानिक पातळीवरील लोकांना वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध झाला पाहिजे. त्यासाठी लोकांना विकास कार्यक्रमांत जास्तीत जास्त प्रमाणात सहभागी करून घ्यावे लागेल.

६) पंचायती राज्य व्यवस्था बळकट होण्यासाठी त्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक संसाधने केंद्र तसेच राज्य सरकारांच्या माध्यमातून उपलब्ध झाली पाहिजेत.

७) शेवटचा परंतु सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे स्थानिक पातळीवरील राजकारण हे पक्षविरहित राजकारण असले पाहिजे,अशी आपल्या संविधानकर्त्यांची अपेक्षा होती त्यासाठी आपण सदैव प्रयत्नशील असले पाहिजे.

थोडक्यात पंचायती राज्याची संकल्पना व हेतू ग्रामीण भागात लोकांचा सहभाग व त्यातून नव्या लोकनेतृत्वाचा उदय हा आहे. ग्रामपंचायतीपासून जिल्हा परिषदेपर्यंतच्या कामात सहभागी होऊन हे नेतृत्व तयार व्हावे, त्यासाठी त्यांना अनुभवाने शिकण्याची संधी दिली पाहिजे. त्याशिवाय असे लोकनेतृत्व कसे तयार होईल? यावर साधक-बाधक चर्चा होणे ही काळाची गरज आहे.